कि. दि. अर्ज क्र. ०४/२०२६
प्रभा वि. निरंक
CNR-MHAK090000202026

**<u>आदेश नि.क्र. ०१ वर</u>**
(दि.१७.०३.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act) १८२७ च्या कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत **गणेश पुरणगीर गिरी** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ व ४ ह्या मुली आहेत. **गणेश पुरणगीर गिरी** यांचा मृत्यु **दि.०७.०९.२०२५** रोजी अमरावती, ता. जि. अमरावती येथे झाला. मयताच्या आईचा मृत्यु बरेच वर्षांपुर्वी झालेला आहे.

३. अर्जदारांनी असे सादर केले आहे की, अर्जदार हेच केवळ मयत **गणेश पुरणगीर गिरी** यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत **गणेश पुरणगीर गिरी** हा सोनोरी-बपोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला येथील कायम रहीवासी होता. अर्जदारांना अधिकृत हेतू आणि खाजगी वापरासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे. म्हणून, उपस्थित अर्ज.

४. दि.०९.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सायटेशन नोटीस, वृत्तपत्रामधील जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्या. सायटेशन नोटीसची बजावणी दि.१२.०२.२०२६ रोजी झालेली असून ती **निशाणी-०६** वर दाखल आहे. दैनिक "**सायरन**" या वृत्तपत्रामध्ये दि.२६.०१.२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसची प्रत **निशाणी-१८** वर अभिलेखावर दाखल केली आहे. आजपर्यंत सदर अर्जास कोणीही आक्षेप घेतला नाही. अर्जदारांनी सदरहु अर्जासोबत मयत **गणेश पुरणगीर गिरी** यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची पडताळीत प्रत **निशाणी–१०** वर दाखल केली आहे. अर्जदारांच्या आधारकार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती **निशाणी-१३ ते १६** वर दाखल केल्या आहेत.

५. अर्जदारातर्फे **अर्जदार क्र.२ सचितानंद गणेश गिरी** यांनी आपल्या कथनाच्या पुष्ठयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाणी-०९** वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे कथन केले आहे. त्यांच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, मयत **गणेश पुरणगीर गिरी**

यांचे अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्जदारांच्या कागदोपत्री आणि तोंडी पुराव्यावरून असे दिसून येते की, अर्जदार हे मयत **गणेश पुरणगीर गिरी** यांचे कायदेशीर वारस आहेत. अशा प्रकारे, ते 1827 च्या बॉम्बे रेग्युलेशन VIII च्या कलम-2 अंतर्गत अर्जदार हे वारस प्रमाणपत्र देण्यास पात्र आहेत. मयत हा मुर्तिजापूर अधिकारक्षेत्रातील कायम रहिवासी होता. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | अर्जदार :-<br>**१. प्रभा गणेश गिरी,**<br>**२. सचितानंद गणेश गिरी,**<br>**क्र.१ व २** रा. सोनोरी बपोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.<br>**३. सविता संतोष गिरी,**<br>रा. कंजना, ता. जि. अमरावती.<br>**४. शारदा नितीन पुरी,**<br>रा. जामठी बु., ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.<br>हे **गणेश पुरणगीर गिरी**, ज्यांचा मृत्यु **दि.०७.०९.२०२५** रोजी अमरावती, ता. जि. अमरावती या ठिकाणी झाला, यांचे कायदेशीर वारस आहेत. |
| **३.** | अर्जदारांनी नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरावा. |
| **४.** | **टिप-** सिवील मॅनुअल परिच्छेद क्र.३१२ चा वारस प्रमाणपत्रामध्ये उल्लेख करण्यात यावा. |

RADHARAMAN RAMDAS PAKADE

Digitally signed by RADHARAMAN RAMDAS PAKADE
Date: 2026.03.18 15:01:45 +0530

**दि. १७.०३.२०२६**

**( आर.आर. पकडे )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**मुर्तिजापूर.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Murtizapur. |
| Date of Order/Judgment | 17.03.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 17.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | 18.03.2026 |